**डी.एम.एल.टी. किंवा तत्सम अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींना राज्यातील विनिर्दिष्ट क्षेत्रांमध्ये विनिर्दिष्ट विकृतिचिकित्सा तपासण्या करण्याचे अधिकार प्रदान करण्याच्या दृष्टीने तज्ञांची एक समिती घटित करणेबाबत.**

# <u>महाराष्ट्र शासन</u>

**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग**

शासन निर्णय क्र. एमएमपी-०५१६/प्र.क्र.२३/अधिनियम
९वा मजला, नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१.
दिनांक २६ मे, २०१६

**<u>प्रस्तावना:-</u>**

राज्यात नोंदणीकृत विकृतिशास्त्रज्ञांची (Pathologists) संख्या २,२७१ इतकी आहे. राज्यातील जनतेच्या आरोग्यसंबंधी गरजा विचारात घेता ही संख्या निश्चितपणे अपुरी आहे. त्याशिवाय, त्यापैकी बहुसंख्य नोंदणीकृत विकृतिशास्त्रज्ञ हे राज्याच्या नागरी क्षेत्रांमध्ये व्यवसाय करतात. त्यामुळे, राज्याच्या ग्रामीण क्षेत्रांमधील जनतेला विकृतिचिकित्सा तपासण्यांची सुविधा तत्परतेने उपलब्ध व्हावी म्हणून महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम, २०११ (२०१६ चा महा. अधि. क्र. ६) अंमलात आल्यावर महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे नोंदणी केलेल्या डी.एम.एल.टी. व तत्सम अर्हता धारण करणारे व्यक्ती यांना राज्याच्या ग्रामीण क्षेत्रांमध्ये विनिर्दिष्ट विकृतिचिकित्सा तपासण्या स्वतंत्रपणे करण्याचे अधिकार प्रदान करण्याबाबत राज्य शासन विचार करीत आहे.

२. त्याकरिता डी.एम.एल.टी. व तत्सम अर्हता धारण करणारे व्यक्ती यांना नेमक्या कोणत्या विकृतिचिकित्सा तपासण्या स्वतंत्रपणे करण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत, याबाबत शासनास शिफारस करण्यासाठी सह-संचालक (वैद्यकीय), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती घटित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन आता पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय:-**

डी.एम.एल.टी. व तत्सम अर्हता धारण करणारे व्यक्ती यांना नेमक्या कोणत्या विकृतिचिकित्सा तपासण्या स्वतंत्रपणे करण्याचे अधिकार प्रदान करण्यात यावेत, त्याबाबत शासनास शिफारस करण्यासाठी, याद्वारे, पुढीलप्रमाणे एक समिती घटित करण्यात येत आहे:-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सह-संचालक (वैद्यकीय), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | ... | अध्यक्ष |
| २. | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी नामनिर्देशित केलेले राज्यातील शासकीय वैद्यक महाविद्यालयांमधील जास्तीत जास्त चार विकृतिशास्त्रज्ञ. | ... | सदस्य |
| ३. | अध्यक्षांनी सदस्यांमधून नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती. | ... | सदस्य-सचिव. |

२. उक्त समिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला अहवाल मोहोरबंद लिफाफ्यात शासनास सादर करील.

३. उक्त समितीचे अध्यक्ष व सदस्य यांना अंमलात असलेल्या नियमानुसार भत्ते देय असतील.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संदर्भ क्रमांक २०१६०५२७१३३५३३३५१३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sadashiv Sambhaji Benake

Digitally signed by Sadashiv Sambhaji Benake
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Sadashiv Sambhaji Benake
Date: 2016.05.27 13:53:10 +05'30'

**(सदाशिव बेनके)**
शासनाचे उपसचिव.

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, वाळकेश्वर मार्ग, मलबार हिल, मुंबई-४०००३५.
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
३. मा. वैद्यकीय शिक्षण मंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
४. मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान भवन, मुंबई-४०००२१.
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन, मुंबई-४०००२१.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
८. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१.
९. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, फोर्ट, मुंबई.

**प्रत:-**

१. आयुक्त अन्न व औषध प्रशासन, सर्व्हे क्र. ३४१, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, २रा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
२. निवड फाईल (अधिनियम).